वाचलेः-

१) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृती वेतन)नियम-१९८२ -मधील नियम १०(१)

२) आदेश क्र.माध्य/शि/०१/कावि/७८२/२००७ दि.१८/१२/२००७

३) मा.आयुक्त, यांचेकडील अधिकार प्रदान आदेश प्रशा/२/कावि/४४७/२०१५ दि.२०/१०/१५

४) मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय,कासारवाडी यांच्याकडील क्र.४४/२४ दि.१३/०२/२०२४ चे पत्र

५) दि. १५/०३/२०२४ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/६६/२०२४
दि. १५/०३/२०२४

विषय –<u>नियत वयोमानानूसार सेवानिवृत्तीबाबत.</u>

श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" सं.क्र.७८९७

आदेश,

श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहाय्यक शिक्षक या पदावर दि.०३/१०/१९९६ रोजी माध्यमिक शिक्षण विभागात रूजू झालेले आहेत. श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" यांच्या मुळ सेवानोंद पुस्तकानुसार त्यांची जन्म तारीख दि.०१/०६/१९६६ अशी असून त्यांच्या वयास दिनांक - ३१/०५/२०२४ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" यांना दि.३१/०५/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (१) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची ५८ वर्ष पुर्ण होतील, त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमाननुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज,घरबांधणीकर्ज,वाहनकर्ज,संगणक कर्ज,घरदूरूस्ती कर्ज,वैद्यकीय अग्रीम,कामगार कल्याण व माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी सोसायटी कर्ज तसेच इतर कोणतेही येणे बाकी नसलेबाबत विद्यालयाने दाखले सादर केलेले आहेत. तसेच श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" यांच्या सेवानोंद पुस्तकाची तपासणी केली असता त्यांना दि.०३/१०/१९९६ ते दि.११/०४/२००० अखेर पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागातील केलेली सेवा (स्टॉप गॅप ॲरेंजमेंट) जोडून घेणेबाबत (सेवासातत्य) वाचले क्र.०२ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

सबब,मी सहाय्यक आयुक्त,माध्यमिक शिक्षण विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८ उपरोक्त वाचले क्र.०३ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन )नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" यांना दिनांक - ३१/०५/२०२४ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तूत आदेशाची सविस्तर नोंद श्री.पानसरे संपत गोविंद "मुख्याध्यापक" यांचे मुळ सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्री.पानसरे संपत गोविंद “मुख्याध्यापक”
माध्यमिक विद्यालय कासारवाडी

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन)
सेवाजेष्ठता कक्ष,मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. ४
४) माध्यमिक विद्यालय कासारवाडी
२/- पुढील कार्यवाहीसाठी